॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade NAAC Reaccredited (4th Cycle)
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

**गुणवत्ता यादी तयार करण्यासाठीची नवीन सुधारित नियमावली लागू करण्याबाबत.**

परीक्षा व मूल्यमापन मंडळ
जा.क्र.कबचौउमवि/गुणवत्ता यादी नियमावली/2392/2026
दिनांक:-25जुलै, 2026

**परिपत्रक क्र.48/2026**

वाचा :-(1) जा.क्र.कबचौउमवि/गुणवत्ता यादी नियमावली/4941/2018(परिपत्रक क्र.342/2018)
(2)व्य.प.ठराव क्र. ए-285/2025, दिनांक 27/12/2025

प्रस्तावना:

संदर्भाकिंत (1) अन्वये गुणवत्ता यादी तयार करण्याबाबतची नियमावली प्रसिध्द करण्यात आली होती. तथापि, संदर्भाकिंत (1) वरील गुणवत्ता यादीत येणाऱ्या त्रुटी संदर्भात सकारात्मक मार्ग काढण्याकरीता पुन:श्च गुणवत्ता यादी तयार करण्यासाठी संदर्भाकिंत (2) नुसार व्यवस्थापन परिषद ठराव क्र. ए-285/2025, दिनांक 27/12/2025 अन्वये नविन सुधारित गुणवत्ता यादी तयार करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली. सदर समितीने केलेल्या शिफारशीस मा.कुलगूरू महोदयांनी मान्यता प्रदान केल्यानुसार नविन सुधारित नियमावली माहे मार्च/एप्रिल, 2026 च्या परीक्षापासून लागू करण्यात येत आहे.

## गुणवत्ता यादी तयार करण्यासाठीची सुधारीत नियमावली

01. गुणवत्ता यादी तयार करण्याची नियमावली ही व्यावसायीक व अव्यावसायीक या सर्व अभ्यासक्रमांकरिता तसेच विद्यापीठ प्रशाळा आणि संलग्नीत महाविद्यालयासाठी एकच राहील.
02. गुणवत्ता यादी तयार करतांना ती फक्त पदवी व पद्व्युत्तर अभ्यासक्रमांसाठीच केली जाईल. प्रमाणपत्र किंवा पदविका अभ्यासक्रमांचा गुणवत्ता यादीत समावेश राहणार नाही.
03. विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या अंतीम वर्षाच्या गुणपत्रकाच्या आधारेच गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. त्यात CGPA, ग्रेड व एकुण गुण यांचा समावेश असेल. तथापि एकापेक्षा जास्त विद्यार्थ्यांचा CGPA जर समान अथवा सारखा आल्यास, अशा स्थितीत त्या विद्यार्थ्यांस एकुण प्राप्त गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.
04. गुणवत्ता यादी जाहिर करतांना ती विद्यापीठाच्या प्रशाळेत / विभागात व संलग्नित महाविद्यालयात शिकविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमांची स्वतंत्रपणे जाहिर करण्यात येईल. तथापि सुवर्णपदकासाठी ज्या विद्यार्थ्यांस सर्वांत जास्त CGPA असेल, त्याचा त्या-त्या पदकासाठी विचार करण्यात येईल.
05. जे विद्यार्थी विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयात / मान्यताप्राप्त परिसंस्था / विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग / प्रशाळेत संबंधित अभ्यासक्रम हा सलगपणे विहीत कालावधीतच पूर्ण करतील, अशाच विद्यार्थ्यांचा या गुणवत्ता यादीसाठी विचार करण्यात येईल.
06. जर एखाद्या विद्यार्थ्यांचे सत्र परीक्षेत काही विषय अनुत्तीर्ण (Backlog) राहिले असतील, मात्र त्याने विहीत कालावधीत तो अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण केला असला तरी सुध्दा अशा विद्यार्थ्यांचा गुणवत्ता यादीसाठी विचार केला जाणार नाही.
07. विद्यापीठाने निर्धारीत केलेल्या ज्या अभ्यासक्रमास प्रविष्ठ असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या 1500 पेक्षा कमी असल्यास अशा अभ्यासक्रमासाठी गुणवत्ता यादी तयार करतांना 03 विद्यार्थ्यांची नावे व ज्या अभ्यासक्रमास 1500 पेक्षा अधिक विद्यार्थी प्रविष्ठ आहेत, अशा अभ्यासक्रमासाठी 05 विद्यार्थ्यांच्या नावांचा गुणवत्ता यादीत समावेश करण्यात येईल.
08. Dual Degree अभ्यासक्रमास नियमित व पूर्णवेळ प्रवेशित विद्यार्थी दोन्ही अभ्यासक्रमाच्या गुणवत्ता यादीसाठी व सुवर्ण पदकासाठी पात्र राहिल.

09. निकाल जाहीर झाल्यानंतर अध्यादेश 49 व 134 अन्वये संबंधित विद्यार्थ्याचे CGPA किंवा गुणात (अभ्यासक्रमांच्या पध्दतीनुसार ) वाढ होवून त्यात बदल झाल्यास, गुणवत्ता यादी तयार करतांना वाढीव CGPA / गुण ग्राह्य धरण्यात येईल.
10. जे विद्यार्थी समान अध्यादेश O.1 व O.4 चा लाभ घेऊन पदवी अथवा पदव्युत्तर अभ्यासक्रम उत्तीर्ण करतील, अशा विद्यार्थ्यांचा गुणवत्ता यादीत समावेश केला जाणार नाही. तसेच जे विद्यार्थी अध्यादेश 163 चा लाभ घेवून एखादा विषय उत्तीर्ण झालेले असतील, अशाही विद्यार्थ्यांचा गुणवत्ता यादीत समावेश केला जाणार नाही. (समान अध्यादेशाचा तपशील विद्यापीठाच्या संकेतस्थळावर www.nmu.ac.in/examination/user/ordinance.html उपलब्ध आहे.)
11. पुनर्परीक्षार्थी/बहिस्थ/ दुरस्थ शिक्षण (Distance Education) /श्रेणी सुधार इ. सुविधांचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा गुणवत्ता यादीत समावेश केला जाणार नाही.
12. गुणवत्ता यादी ही वर्षातून फक्त एकदाच (उन्हाळी सत्रासाठी) जाहिर करण्यात येईल व त्यात ज्या परीक्षांचे निकाल दि. 15 नोव्हेंबर पर्यंत जाहीर झालेले आहेत, अशा अभ्यासक्रमांचा गुणवत्ता यादी तयार करतांना विचार केला जाईल.
13. तात्पुरती गुणवत्ता यादी दरवर्षी दि. 1 नोव्हेंबर पर्यंत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.nmu.ac.in) जाहीर करण्यात येईल. ही तात्पुरती गुणवत्ता यादी प्रसिध्द झाल्यानंतर आठ दिवसाच्या आंत विद्यार्थी त्यावर हरकती घेऊ शकतील. तथापि सदर हरकतीचे अर्ज मा. प्राचार्य / मा. संचालक यांनी शहनिशा करुन शिफारसीसह पाठविणे आवश्यक असेल. मुदतीनंतर प्राप्त हरकती / विनंती अर्जावर नंतर कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही.
14. अंतीम गुणवत्ता यादी दरवर्षी दि. 1 डिसेंबर पर्यंत विद्यापीठ संकेत स्थळावर (www.nmu.ac.in) प्रसिध्द करण्यात येईल.
15. प्रस्तुत सुधारीत गुणवत्ता यादी नियमावली ही विद्यापीठाच्या माहे-एप्रिल/मे/जून 2026 च्या परीक्षेपासून लागू करण्यात आली आहे.
16. वरील गुणवत्ता यादीतील नियमांसंदर्भात काही अडचणी किंवा अपवादात्मक परिस्थिती निर्माण झाल्यास त्यावर निर्णय घेण्याचा अधिकार मा. कुलगुरू महोदयांना राहील, आणि त्यांचा निर्णय अंतिम राहील.

**वरीलप्रमाणे गुणवत्ता यादी तयार करण्यासाठीचे नियम हे सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देवून विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.**

**(प्रा.यो.ना.पाटील)**
**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

प्रति,

1. क.ब.चौ.उ.म.वि., जळगावशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य.
2. क.ब.चौ.उ.म.वि., जळगावशी संलग्नित सर्व मान्यताप्राप्त परिसंस्थाचे मा. संचालक.
3. क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव च्या सर्व प्रशाळांचे मा. संचालक आणि शैक्षणिक विभागांचे प्रमुख.
4. उपकुलसचिव/सहा.कुलसचिव/कक्षाधिकारी, परीक्षा मूल्यमापन मंडळ (अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व रेकॉर्ड) क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.
5. उपकुलसचिव/सहा.कुलसचिव/कक्षाधिकारी, परीक्षा मूल्यमापन मंडळ (कला,विज्ञान, शिक्षणशास्त्र व वाणिज्य विद्याशाखा) क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव.
6. प्र. संगणक केंद्र प्रमुख, परीक्षा व मूल्यमापन मंडळ क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.
7. परीक्षा व मूल्यमापन मंडळ मधील सर्व उपविभागांचे प्रमुख/नियंत्रक अधिकारी, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.
8. विद्यापीठाचे प्रशासकीय विभागांचे मा. संचालक/विभाग प्रमुख/नियंत्रक अधिकारी, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.